पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(संलग्नता विभाग)
ई-मेल: affiliation@sus.ac.in

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# परिपत्रक

(शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिताचे विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यासपाठयक्रम/विषय/अतिरिक्त तुकडी/विद्याशाखा (पारंपारिक अभ्यासक्रम) सुरू करणेबाबतचे प्रस्ताव NCPS या ऑनलाईन प्रणालीमार्फत व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रस्ताव ऑफलाईन पध्दतीने (फिजिकल स्वरूपात) विद्यापीठाकडे सादर करणेबाबत)

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिताचे विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यासपाठयक्रम/विषय/अतिरिक्त तुकडी/विद्याशाखा (पारंपारिक अभ्यासक्रमाचे) सुरू करणेबाबत महाविद्यालयांकडून विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत व विद्यापीठाकडून शासन मंजूरीसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेसंदर्भात महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून NCPS ही ऑनलाईन प्रणाली (https://htedu.maharashtra.gov.in/NCPS) विकसीत केलेली आहे. शैक्षिणिक वर्ष २०२६-२७ करिताचे प्रस्ताव हे फिजीकल स्वरूपात न स्विकारता NCPS ऑनलाईन प्रणालीमार्फतच शासनास सादर करणेबाबत कळविले आहे. (सोबत महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एनजीसी-२०२५/ई-१३१९८७८/ मशि-४, दिनांक १८/०९/२०२५ अन्वये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा अतिरिक्त तुकडी यांना NCPS या ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे मंजूरी देण्यासाठी कार्यपध्दती व निकष विहित करण्यात आले आहेत.)

त्याअनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिताचे विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यासपाठयक्रम/विषय/अतिरिक्त तुकडी/विद्याशाखा सुरू करणेबाबतचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करावयाचे आहेत. त्या महाविद्यालयांनी महाराष्ट्र शासनाच्या NCPS ऑनलाईन प्रणालीमार्फतच दिनांक ३०/०९/२०२५ पूर्वी प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावेत. सदर प्रस्तावाचे शुल्क विद्यापीठाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार भरणे आवश्यक आहे. NCPS Portal वर सदर शुल्काचा भरणा केल्याची माहिती भरणे आवश्यक आहे. सदर शुल्काचा भरणा करताना प्रस्तुत विद्यापीठाची संलग्नता विभागाशी संपर्क करून प्रस्ताव शुल्क भरणेबाबतचा अर्ज करून त्यावर संलग्नता विभागाचा शेरा घेवूनच विद्यापीठाच्या प्रचिलत पध्दतीनुसार प्रस्ताव शुल्काचा भरणा करून प्रस्ताव शुल्काची पावती व शुल्काबाबतची माहिती NCPS संगणक प्रणालीमध्ये अपलोड करावी. पारंपारकि अभ्यासक्रमाच्या फिजिकल स्वरूपात प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जाणार नाही योची नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिताचे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणेबाबत तसेच वाढीव विद्यार्थी प्रवेश क्षमते बाबतचे प्रस्ताव सादर करताना विद्यापीठाच्या प्रचलित पध्दतीनुसार ऑफलाईन (फिजीकल स्वरूपात) प्रस्ताव ०२ प्रतीत दिनांक ३०/०९/२०२५ पर्यंत विहित शुल्कासह विद्यापीठास सादर करावेत. विहित वेळेनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(डॉ. उ. पि. मेटकरी)
उपकुलसचिव

जा.क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/NCPS /२०२५-२६/ 6483

दिनांक : 22 SEP 2025

(कृपया मागे पहा)

सोबत :- दिनांक १९/०८/२०२५ रोजीचा शासन निर्णय.

प्रति,

मा. प्राचार्य/प्रभारी प्राचार्य/संचालक/अध्यक्ष/सचिव,
सर्व संलग्नित महाविद्यालये, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

प्रत :- वित्त व लेखा विभाग - माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव
सदरचे परिपत्रकानुसार महाविद्यालयांना अंतिम शुल्क भरण्याची मुदत ही दिनांक ३०/०९/२०२५ असल्याने प्रस्ताव शुल्क भरलेली पावती ही महाविद्यालयांना NCPS Portal वरती अपलोड करायची असल्याने ज्या दिवशी महाविद्यालये प्रस्ताव शुल्क भरतील त्याच दिवशी त्यांना पावती वितरीत करण्यात यावी.